# नवी मुंबई महानगरपालिका
## महापालिका सर्वसाधारण सभा

महानगरपालिकेच्या **शुक्रवार, दिनांक २१ डिसेंबर २०१२ रोजी** भरलेल्या माहे डिसेंबर महिन्याच्या सर्वसाधारण मासिक तहकूब सभेतील **मंजूर/नामंजूर** इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे :-

| | |
|---|---|
| **विषय क्र. १.**<br>**दि. १९ डिसेंबर २०१२** | **(अ)** महापालिका सचिव यांजकडून मा. महापौर यांस आलेले दिनांक ११/१२/२०१२ चे पत्र  क्र. नमुंमपा/मस/४१३०/२०१२.<br>**(ब)** महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियम अधिनियम १९७७ व त्याची नियमावली १९८१ च्या अनुसूची "अ " माध्यमिक शाळा संहिता परिशिष्ट ३ नियम १०"(ब)" अन्वये, नामनिर्देशनाव्दारे नवी मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण समितीवर ११ सदस्यांची नेमणुक करणे. |
| **ठराव क्र. २.**<br>**दि. २१ डिसेंबर २०१२** | महापौरांनी यावेळी असे निवेदन केले की, "महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियम अधिनियम १९७७ व त्याची नियमावली १९८१ च्या अनुसुची "अ" माध्यमिक शाळा संहिता परिशिष्ट ३ नियम १० " (ब) " अन्वये, मान्यताप्राप्त पक्षाचे अथवा नोंदणीकृत पक्षाचे किंवा गटाचे तौलनिक संख्याबळ विचारात घेऊन संख्याबळाच्या प्रमाणात प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देऊन शिक्षण समितीवर ११ सदस्यांची नामनिर्देशनानुसार नियुक्ती करावयाची आहे. शिक्षण समितीवर ११ सदस्यांची नेमणूक करतांना एकूण सदस्य संख्या ८९ ÷ ११ = ८.०९ हे प्रमाण येईल. ८.०९ यास १ याप्रमाणे नेमणूक करण्यात येईल. दिनांक ६ मार्च २००७ च्या शासन निर्देशानुसार सर्वप्रथम पुर्णांकाचे आधारे नेमणूका करण्यात येतील व त्यानंतर जर एखादी जागा रिक्त राहिल्यास अशा जागेवर ज्या पक्षाचे किंवा गटाचे अपुर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे अशाच पक्ष किंवा गटाच्या पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात येईल. महानगरपालिकेच्या शिक्षण समितीवर ११ सदस्यांची नामनिर्देशनाद्धारे नियुक्ती करतांना अनुसरावयाच्या कार्यपध्दतीनुसार सभागृह नेता, विरोधी पक्षनेता आणि प्रत्येक पक्षाचा नेता किंवा गटनेता यांच्यामार्फत बंद लखोट्यात पुढीलप्रमाणे नावे प्राप्त झाली आहेत.<br>त्या अनुषंगाने मा. महापौर यांनी असे जाहीर केले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पक्ष प्रतोद श्री. विनीत मोतीराम पालकर यांचेकडून ७ नांवे आलेली आहेत ती पुढील प्रमाणे आहेत :- |

| **अ.क्र.** | **सदस्याचे नांव** |
|---|---|
| १. | श्री. पुरुषोत्तम भोईर |
| २. | श्री.हरिश वाघमारे |
| ३. | श्री.राजेश घाडी |
| ४. | श्री.प्रमोद जोशी |
| ५. | श्री.निनाद पाटील |
| ६. | श्री.महेंद्र शेलार |

| | |
|---|---|
| ७. | श्री.दिनेश पारेख |

त्यानंतर असे जाहीर केले की, शिवसेना पक्षाचे पक्ष प्रतोद श्री. राजू नामदेव पाटील यांचेकडून २ नांवे आलेली आहेत ती पुढील प्रमाणे आहेत :-

| अ.क्र. | सदस्याचे नांव |
|---|---|
| १. | ॲड.श्री.रेवेंद्र पाटील |
| २. | श्री.रामचंद्र घरत |

त्यानंतर असे जाहीर करण्यात आले की, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाच्या पक्ष प्रतोद सौ. हेमांगी अंकुश सोनावणे यांचेकडून २ नांवे आले आहे ते पुढील प्रमाणे आहे :-

| अ.क्र. | सदस्याचे नांव |
|---|---|
| १. | श्री.भालचंद्र कोळी |
| २. | श्री.चंद्रकला नायडू |

तद्नुसार मा. महापौर यांनी असे जाहिर केले की, सभागृह नेता, विरोधी पक्षनेता आणि प्रत्येक पक्षाचा नेता किंवा गटनेता यांच्याकडून प्रस्तावित केल्याप्रमाणे, खालील ११ सदस्यांची अडीच वर्षाकरिता "महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियम अधिनियम १९७७ व त्याची नियमावली १९८१ च्या अनुसुची "अ" व माध्यमिक शाळा संहिता परिशिष्ट ३ नियम १० ब अन्वये, नामनिर्देशनाद्वारे रितसर नियुक्ती करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | सदस्याचे नांव |
|---|---|
| १. | श्री. पुरुषोत्तम भोईर |
| २. | श्री.हरिश वाघमारे |
| ३. | श्री.राजेश घाडी |
| ४. | श्री.प्रमोद जोशी |
| ५. | श्री.निनाद पाटील |
| ६. | श्री.महेंद्र शेलार |
| ७. | श्री.दिनेश पारेख |
| ८. | ॲड.श्री.रेवेंद्र पाटील |
| ९. | श्री.रामचंद्र घरत |
| १०. | श्री.भालचंद्र कोळी |
| ११. | श्री.चंद्रकला नायडू |

तद्नंतर शिक्षण समितीवर निवडून आलेल्या ११ नवनिर्वाचित सदस्यांचा मा. महापौर, मा. उपमहापौर आणि मा. आयुक्त यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

**निर्णय -** **मंजूर.**

| | |
|---|---|
| **विषय क्र. २.**<br>**दि. १९ डिसेंबर २०१२** | **(अ)** नवी मुंबई महानगरपालिकेतील निवडून आलेल्या सदस्यांपैकी एका सदस्याची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कळंबोली येथील प्रादेशिक आयर्न आणि स्टील समितीवर नियुक्ती करणेबाबत, मार्केटिंग मॅनेजर टी. एम. सोहनी, वडाळा, मुंबई यांचे दिनांक ०६ नोव्हेंबर २०१२ चे पत्र क्र. टी/एम.एम./ॲन्ड एस.एम.सी./ इले./५३८/२०१२.<br>**(ब)** नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने एका सदस्याची हात वर करुन साध्या बहुमताने निवड करणे. |
| **<u>ठराव क्र. ३.</u>**<br>**दि. २१ डिसेंबर २०१२** | "मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कळंबोली येथील "प्रादेशिक आयर्न आणि स्टील समिती" वर नवी मुंबई महानगरपालिकेतील निवडून आलेल्या सदस्यांपैकी श्री. संजय बाळाजी पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर.</u>** |
| **विषय क्र. ३.**<br>**दि. १९ डिसेंबर २०१२** | प्रश्नोत्तरे |
| **निर्णय -** | **<u>मंजूर.</u>** |
| **विषय क्र. ४.**<br>**दि. १९ डिसेंबर २०१२** | पामबीच मार्ग येथील अक्षर बिल्डिंग ते एम.एम.ई.बी. ऑफिस समांतर गटर बांधण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक ०९/१०/२०१२ चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ/१०४१/२०१२. |
| **<u>ठराव क्र. ४.</u>**<br>**दि. २१ डिसेंबर २०१२** | "पामबीच मार्ग येथील अक्षर बिल्डिंग ते एम.एम. ई. बी. ऑफिस समांतर गटर बांधण्याच्या कामासंबंधातील एकूण रक्कम रुपये १,१०,३८,५४२/- इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर.</u>** |
| **विषय क्र. ५.**<br>**दि. १९ डिसेंबर २०१२** | लिंक वर्कर हयांचे मानधन व कर्तव्य सुचीच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक ०३/११/२०१२ चे पत्र क्र. नमुंमपा/आरोग्य/४८३५/२०१२. |
| **<u>ठराव क्र. ५.</u>**<br>**दि. २१ डिसेंबर २०१२** | "लिंक वर्कर यांना ठोक मानधना (राज्य शासन) व्यतिरिक्त रु. ४५००/- प्रति लिंक वर्कर प्रति महा नमुंमपा मार्फत अदा करणे, दर सहा महिन्यांनी त्यांचे मुल्यमापन करुन ५०% पेक्षा कमी गुण असणा-या लिंक वर्करची सेवा खंडीत करण्याचे मा.आयुक्तांना अधिकार प्रदान करण्यास, समाधानकारक कामकाज असल्यास प्रति वर्ष रु.१०००/- मानधन वाढ (कमाल मर्यादा रु.१००००/- पर्यंत पुढील पाच वर्षासाठी) देण्यास, तसेच मानधनासाठी येणारा खर्च रु.१ कोटी ८ लक्ष, नमुंमपा अंदाजपत्रक २०१२-१३ च्या आरोग्य विभागासाठी वेतन व भत्ते लेखाशिर्षाअंतर्गत तरतुद रक्कम रु.५५.६० कोटी मधून करणे व प्रस्तावात नमुद करण्यात आलेल्या बाबींसह लिंक वर्कर यांना द्यावयाचे वाढीव मानधन व कर्तव्यसुची विषयक धोरणास प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर.</u>** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. ६.**<br>**दि. १९ डिसेंबर २०१२** | ऐरोली दिवानगर येथे स्काय वॉक बांधणे या कामाच्या निविदा रक्कमेस सुधारित प्रशासकीय मंजूरी मिळण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक ०१/१२/२०१२ चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./१३७२/२०१२. |
| **ठराव क्र. ६.**<br>**दि. २१ डिसेंबर २०१२** | "ऐरोली दिवानगर येथे स्काय वॉक बांधण्याच्या कामासंबंधातील एकूण रक्कम रुपये ३,३६,३५,०४९/- इतक्या सुधारीत खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **मंजूर.** |
| **विषय क्र. ७.**<br>**दि. १९ डिसेंबर २०१२** | नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. ११, कुकशेत येथील शाळेच्या दुसऱ्या मजल्यावर वाढीव बांधकाम करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक १०/१२/२०१२ चे पत्र क्र. नमुंमपा/अ.श.अ./९९०/२०१२. |
| **ठराव क्र. ७.**<br>**दि. २१ डिसेंबर २०१२** | "नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. ११, कुकशेत येथील शाळेच्या दुसऱ्या मजल्यावर वाढीव बाधकाम करण्याच्या कामासंबंधातील एकूण रक्कम रुपये १,१६,६६,३३८/- इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **मंजूर.** |
| **तांतडीचे कामकाज क्र.२८१.**<br>**दि. १९ डिसेंबर २०१२** | नवी मुंबई, वाशी, सेक्टर क्र.१४ येथील नवी मुंबई महानगरपालिकेस हस्तातरीत झालेल्या भूखंड क्र.२/४ व २/५ या डेली बाजार/हॉकर्स बाजार या वापराच्या भूखंडावर कम्युनिटी सेंटर बांधणेकरीता वापर बदल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वयेची कार्यवाही करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक १७/१२/२०१२ चे पत्र क्र. नमुंमपा/नरवि/६८७६/२०१२. |
| **ठराव क्र. ३३.**<br>**दि. २१ डिसेंबर २०१२** | "नवी मुंबई, वाशी, सेक्टर क्र. १४ येथील नवी मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेल्या भुखंड क्र. २/४ व २/५ या डेली बाजार/हॉकर्स बाजार हा वापर बदल करुन त्याऐवजी कम्युनिटी सेंटर असा वापरात बदल करण्यासंबंधात जनतेकडून लेखी स्वरुपात हरकती व सूचना मागविण्यासाठी महाराष्ट्र शासन राजपत्रात नोटीस प्रसिध्द करण्यास, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी आणि फेरबलासंदर्भात जनतेकडून आलेल्या हरकती व सुचना विचारात घेऊन आणि सुचना/हरकत धारकांना सुनावणीची संधी देऊन, आवश्यक तो बदल करण्यास, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **मंजूर.** |

| | |
|---|---|
| **तांतडीचे कामकाज क्र.२८२.**<br>**दि. १९ डिसेंबर २०१२** | नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमातील गठीत विभागीय पदोन्नती निवड समितीने शिफारस केलेल्या उप अभियंता (यांत्रिकी) या संवर्गातून कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) या संवर्गातील ०१ पात्र अधिकारी यांना पदोन्नती देणेबाबतच्या प्रस्तावास मा.परिवहन समिती व मा. महासभेची मान्यता मिळण्याच्या प्रस्तावाबाबत, परिवहन व्यवस्थापक यांचे दिनांक ०४/१२/२०१२ चे पत्र क्र.नमुंमपा/परि/प्रशा/२०१५/२०१२. |
| **ठराव क्र. ३४.**<br>**दि. २१ डिसेंबर २०१२** | "नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमातील गठीत विभागीय पदोन्नती निवड समितीने शिफारस केलेल्या उप-अभियंता (यांत्रिकी) या संवर्गातून कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) - वेतनश्रेणी (रु. १५६००-३९१००, ग्रेड वेतन ६६००) या संवर्गातील ०१ पात्र अधिकारी यांना याप्रमाणे बदलण्यास, पदोन्नती देणेबाबतच्या मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ३४९ व कलम ५३ अन्वये, सुचविल्याप्रमाणे,मंजुरी देण्यात यावी ." |
| **निर्णय -** | **मंजूर.** |
| **तांतडीचे कामकाज क्र.२८३.**<br>**दि. १९ डिसेंबर २०१२** | नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या आस्थापनेवरील विविध संवर्गाची अर्हता, नियुक्ती पध्दती व मानांकामध्ये अंशत: बदल करणेस व काही संवर्गाची अतिरिक्त तसेच नव्याने पदनिर्मिती करण्यास मा.परिवहन समिती व मा.महासभेची मान्यता मिळण्याच्या प्रस्तावाबाबत, परिवहन व्यवस्थापक यांचे दिनांक ०४/१२/२०१२ चे पत्र क्र.नमुंमपा/परि/प्रशा/२०१६/२०१२. |
| **ठराव क्र. ३५.**<br>**दि. २१ डिसेंबर २०१२** | "नवी मुंबई महानगरपालिकेच्या उपरोक्त प्रस्तावित केल्यानुसार विविध परिवहन आस्थापनेवरील विविध संवर्गाची अर्हता, नियुक्ती पध्दतीमध्ये तसेच मानांकामध्ये अंशत: बदल करण्यास तसेच प्रस्तावित एकूण ११९ विविध पदांची अतिरिक्त व नव्याने पदनिर्मितीची करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ४५४ व कलम ४५७ चे पोटकलम (३) (अ) व (ब) व इतर तरतुदीनुसार प्रस्तावास, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी ." |
| **निर्णय -** | **मंजूर.** |
| **तांतडीचे कामकाज क्र.२८४.**<br>**दि. १९ डिसेंबर २०१२** | तुर्भे औद्योगिक क्षेत्रातील तुर्भे पोलीस स्टेशन जवळ पावसाळी गटार बांधण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक १८/१२/२०१२ चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./१४७२/२०१२. |
| **ठराव क्र. ३६.**<br>**दि. २१ डिसेंबर २०१२** | "तुर्भे, औद्योगिक क्षेत्रातील तुर्भे पोलिस स्टेशन जवळ पावसाळी गटर बांधण्याच्या कामासंबंधीतील एकूण रक्कम रु. ३,२२,२९,८२२/- इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **मंजूर.** |

| | |
|---|---|
| **तांतडीचे कामकाज क्र.२८५.**<br>**दि. १९ डिसेंबर २०१२** | वाशी विभागातील कोपरी गा.वि.यो. अंतर्गत सेक्टर २६ व सेक्टर २६(पार्ट) येथे उर्वरित ठिकाणी मलनिस्सारण वाहिन्या टाकण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक १९/१२/२०१२ चे पत्र क्र. नमुंमपा/अ.श.अ/१०४२/२०१२. |
| **ठराव क्र. ३७.**<br>**दि. २१ डिसेंबर २०१२** | "वाशी विभागातील कोपरी गा.वि.यो अंतर्गत सेक्टर-२६ व सेक्टर २६(पार्ट) येथे उर्वरीत ठिकाणी मलनि:स्सारण वाहिन्या टाकण्याच्या कामासंबंधीतील एकूण रक्कम रु. १,४५,१२,९१०/- इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **मंजूर.** |

**महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आणि उचित कार्यवाहीसाठी मा. आयुक्तांकडे पाठविलेल्या सन्मा. नगरसेवकांच्या ठरावांची यादी**

**माहे डिसेंबर २०१२ ची तहकूब सभा**

| अ.क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १. | **सौ. सुरेखा रविंद्र इथापे, यांजकडून :-**<br>प्र. क्र. ८०, नेरुळ, सेक्टर १९ऐ येथील रायन इंन्टरनॅशनल स्कूल समोरील रस्त्याचे रुदीकरण व डांबरीकरण करणे. | ०८<br>डिसेंबर | ०८<br>२१/१२/२०१२ | मंजूर |
| २. | **सौ. सुरेखा रविंद्र इथापे, यांजकडून :-**<br>प्र. क्र. ८०, नेरुळ, सेक्टर १९ऐ येथील आम्रमार्गालगत निलसिध्दी सोसायटी ते सुमन मॉटेल पर्यंत गार्डनव्दारे सुशोभिकरण करणे. | ०९<br>डिसेंबर | ०९<br>२१/१२/२०१२ | मंजूर |
| ३. | **सौ. सुरेखा रविंद्र इथापे, यांजकडून :-**<br>प्र. क्र. ८०, नेरुळ, सेक्टर १९ ऐ येथील अग्निशमन केंद्रापासुन ते सुमन मॉटेल पर्यंत रस्त्याची डांबरीकरणाने सुधारणा करणे. | १०<br>डिसेंबर | १०<br>२१/१२/२०१२ | मंजूर |
| ४. | **सौ. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-**<br>प्र. क्र. २१, घणसोली गांवामध्ये प्रवेश करताना जो नाला आहे तो अरुंद असल्याकारणाने नागरिकांना तसेच शाळेतील विद्यार्थांना रहदारी अडचण होत आहे तरी सदरच्या नाल्याची रुंदी वाढवून बांधकाम करणे. | ११<br>डिसेंबर | ११<br>२१/१२/२०१२ | मंजूर |
| ५. | **सौ. रेखा विनोद म्हात्रे, यांजकडून :-**<br>प्र. क्र. ८९, करावे गावातील विजेचा पुरवठा वारंवार खंडीत होत असतो तो न होण्यासाठी नमुंमपा तर्फे चालु असलेल्या भुमिगत विद्युत वाहिन्या करण्याच्या कामातुन करावे गावामधील विद्युत रोहित्र(ट्रान्सफार्मर) ११ के. व्हीचे करणे व करावे गावाच्या विद्युत वाहिन्या ११ के. व्हीच्या विद्युत वाहिन्यांना जोडणी करणे. | १२<br>डिसेंबर | १२<br>२१/१२/२०१२ | मंजूर |

| अ.क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| ६. | **सौ. सुरेखा बंडू पाटील, यांजकडून :-**<br>प्र. क्र. १६, सेक्टर १० यशवंतराव चव्हाण उद्यानाचे नव्याने सुशोभिकरण करणे. | १३<br>डिसेंबर | १३<br>२१/१२/२०१२ | मंजूर |
| ७. | **सौ. सुरेखा बंडू पाटील, यांजकडून :-**<br>प्र. क्र. १६, सेक्टर ९, दिवागांव स्मशानभुमी मध्ये अंतर्गत लालमाती टाकुन नवीन शोभिवंत झाडे/ झुडुपे लावणे. | १४<br>डिसेंबर | १४<br>२१/१२/२०१२ | मंजूर |
| ८. | **सौ. सुरेखा बंडू पाटील, यांजकडून :-**<br>प्र. क्र. १६, दिवागांव येथील शाळा व ग्रामपंचायतीच्या कार्यालयाचा भुखंड एकत्र करुन शाळेची बहुउद्देशीय इमारत बांधणे. | १५<br>डिसेंबर | १५<br>२१/१२/२०१२ | मंजूर |
| ९. | **श्री. रंगनाथ कारभारी औटी, यांजकडून :-**<br>प्र. क्र. ६६, मधील चिचोंली तलाव गार्डन मध्ये असणारे शेडमध्ये गणपती विर्सजन, देवी विर्सजन तसेच इतर कामास उपयोगी पडतात त्या शेड फार जुन्या असल्यामुळे सर्व शेड निकामी झाल्या आहेत त्यामुळे सर्व शेडचे अत्याधुनिक बांधणे. | १६<br>डिसेंबर | १६<br>२१/१२/२०१२ | मंजूर |
| १०. | **श्री. रंगनाथ कारभारी औटी, यांजकडून :-**<br>प्र. क्र. ६६, मधील सिडकोने स्वत:कडे असणारे सर्व भुखंड नवी मुंबई महानगरपालिका हस्तांतरीत केलेले आहेत त्या भुखंडावर अत्याधुनिक व्यायाम शाळा तसेच वाचनालय बांधणे. | १७<br>डिसेंबर | १७<br>२१/१२/२०१२ | मंजूर |
| ११. | **श्री. रंगनाथ कारभारी औटी, यांजकडून :-**<br>प्र. क्र. ६६, जुईनगर मध्ये ज्या दोन्ही बाजूने प्रवेश करतात (उत्तर-दक्षिण) त्या दोन्ही बाजुस सुंदर असे प्रवेश द्वाराची कमान बांधणे. | १८<br>डिसेंबर | १८<br>२१/१२/२०१२ | मंजूर |

| अ.क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १२. | **श्री. सुरेश शंकर भिलारे, यांजकडून :-** नवी मुंबई महानगरपालिकेच्या नवीन मुख्यालयासमोरील जागेवरती हिंदूहृदयसम्राट शिवसेना प्रमुख मा. स्व. श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांचे उचित स्मारक उभारणे. | १९<br>डिसेंबर | १९<br>२१/१२/२०१२ | मंजूर |
| १३. | **श्री. सुरेश शंकर भिलारे, यांजकडून :-** नवी मुंबई महानगरपालिकेतील मुख्यालयामधील माता जिजाबाई सभागृहातील कक्ष विस्तारीत करण्यात यावा जेणे करुन मा. पत्रकारांना मुबलक जागा प्राप्त होईल. | २०<br>डिसेंबर | २०<br>२१/१२/२०१२ | मंजूर |
| १४. | **श्री. सुरेश शंकर भिलारे, यांजकडून :-** प्र. क्र. १६ सेक्टर ८, ८अे, व सेक्टर ९ दिवा गाव परिसरातील रस्ते, गटर, फुटपाथ यांची स्थिती चांगली नसल्याने ते युध्द पातळीवर सुधारणा करणे. | २१<br>डिसेंबर | २१<br>२१/१२/२०१२ | मंजूर |
| १५. | **सौ. माधुरी ज. सुतार, यांजकडून :-** शिरवणे गावातील जुने स्वयंभु श्री. गणेश मंदिर आहे. या मंदिराचा जिर्णोध्दार सन २०१० साली झालेला आहे. तरी या मंदिराला भेट देण्यासाठी दुरवरुन भाविक मोठया संख्येने व श्रध्देने येत असतात. या मंदिराकडे येण्यासाठी जुईनगर व शिरवणे या दोन्ही ठिकाणावरुन येण्यासाठी रस्ता आहे तरी शिरवण्यातील जुने ठाणे बेलापूर रस्त्याकडून गणेश मंदिराकडे जाण्यासाठी जो रस्ता आहे तो व्यवस्थीत व निटनिटका बनवण्यात यावा व जुना ठाणे बेलापूर रस्ता ते अंडरपास याला जोडणारा रस्ता येथे एक व जुईनगर येथून आत येणारा रस्ता शिरवणे चिंचोली तलावाजवळ असे दोन नामनिर्देशित कमान प्रथमदर्शिनियसुचित प्रवेशव्दार बनविणे. | २२<br>डिसेंबर | २२<br>२१/१२/२०१२ | मंजूर |

| अ.क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १६. | **सौ. माधुरी ज. सुतार, यांजकडून :-** शिरवणे शोरुम विभागासमोरिल सर्विस रोड व हाईवे रोड मध्ये एम.आर.एफ.शोरुम ते जुईनगर रेल्वे स्टेशन पर्यंत पुर्वीची नेरुल एम.डी.आर.मधील पाणीपुरवठा जलवाहिणी ही भुमीगत नाही.सदर जलवाहिणी भुमिगत नसल्याने नागरिक सदर जलवाहिणीच्या बाजूला केरकचरा व डेब्रिज टाकत आहे. त्यामळे जे शोरुम व्यवसायिक आहे त्यांच्या दुकानासमोर ते विद्रुप दिसत आहे म्हणुन सदर जलवाहिणी ही भुमिगत करुन तेथील परिसराचे शुशोभिकरण करणे. | २३ / डिसेंबर | २३ / २१/१२/२०१२ | मंजूर |
| १७. | **सौ. माधुरी ज. सुतार, यांजकडून :-** शिरवणे प्रभागातील एम.आर.एफ.शोरुम ते शिरवणे फाटा येथील उच्चदाबाच्या विदयुत वाहिण्या भुमिगत करणे. | २४ / डिसेंबर | २४ / २१/१२/२०१२ | मंजूर |
| १८. | **श्री. रमेश गोविंद शिंदे, यांजकडून :-** प्र. क्र.४८ मधील गांवदेवी मंदीरासमोरील भुखंड (कुबेरन यांचा) तेथे खुपच अनधीकृत व्यवसाय चालतात तरी सिडकोकडून सदर भुखंड ताब्यात घेऊन त्यास कुंपण घालावे. | २५ / डिसेंबर | २५ / २१/१२/२०१२ | मंजूर |
| १९. | **श्री. रमेश गोविंद शिंदे, यांजकडून :-** प्र. क्र.४८ मध्ये मोठया प्रमाणात डेंगु व मलेरीया चे प्रमाण वाढलेले आहे. तरी युध्दपातळीवर डास निर्मुलनचा कार्यक्रम राबवणे. | २६ / डिसेंबर | २६ / २१/१२/२०१२ | मंजूर |
| २०. | **सौ. सरोज रोहीदास पाटील, यांजकडून :-** प्र. क्र.८१ मधील आग्रोळी गाव सेक्टर २९ येथील नागरिकांसाठी भुखंड क्र.डी-९ येथील शौचालयाशेजारी असलेल्या मोकळ्या जागेवर महानगरपालिकेमार्फत मोफत वृत्तपत्र वाचनालयाचे बांधकाम करुन लवकरात लवकर वाचनालय सुरु करणे. | २७ / डिसेंबर | २७ / २१/१२/२०१२ | मंजूर |

| अ.क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| २१. | **सौ. सरोज रोहीदास पाटील, यांजकडून :-**<br>प्र. क्र.८१ मधील सी.बी.डी. सेक्टर-१, सेक्टर -९, ९एन रो हाऊस व आग्रोळी गाव येथील रस्त्यावर नवीन पाण्याचा पाईपलाईन्स टाकल्याने खराब झालेल्या रस्त्यांचे लवकरात लवकर डांबरीकरण करणे. | २८<br>डिसेंबर | २८<br>२१/१२/२०१२ | मंजूर |
| २२. | **सौ. सरोज रोहीदास पाटील, यांजकडून :-**<br>प्र. क्र.८१ मधील सी.बी.डी. मधील जेष्ठ नागरिकांसाठी से.९ रो-हाऊस मधील योग्य अशा ठिकाणी जेष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र बनविणे. | २९<br>डिसेंबर | २९<br>२१/१२/२०१२ | मंजूर |
| २३. | **श्री. रतन नामदेव मांडवे, यांजकडून :-**<br>नवी मुंबई शहरात अध्ययन अक्षमता (Learning Disability) असणा-या विद्यार्थी वर्गाची तपासणी चाचणी करण्यासाठी वैद्यकीय तज्ञांची व समुपदेशकांची मनपा रुग्णालयांमध्ये नियुक्ती करणे व अध्ययन अक्षमता असणा-या विद्यार्थ्यांना शालेय परिक्षांमध्ये सुट सवलतीसाठी आवश्यक असणारा दाखला देण्यासाठी उपाययोजना करणे. | ३०<br>डिसेंबर | ३०<br>२१/१२/२०१२ | मंजूर |
| २४. | **श्री. रतन नामदेव मांडवे, यांजकडून :-**<br>शहरात गॅस वितरण, वीज वितरण, दुरध्वनी व माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील शासकीय व खाजगी संस्थाकडून रस्त्यांमध्ये करण्यात येणा-या खोदकामांमुळे निर्माण होणा-या समस्येवर कायम स्वरुपी उपाययोजना म्हणुन नवी मुंबई शहरात रस्त्यांची सुधारणा करताना, रस्ते नव्याने बांधताना आवश्यक स्वरुपातील भुमिगत नलिकांची तरतूद करणे. | ३१<br>डिसेंबर | ३१<br>२१/१२/२०१२ | मंजूर |
| २५. | **श्री. रतन नामदेव मांडवे, यांजकडून :-**<br>शासन धोरणानुसार मनपाचे कार्यालयीन कामकाज कागद विरहीत कार्यपध्दतीने करण्याबाबत आधुनिक तंत्रज्ञानाची व यंत्रसामुग्रीची तरतुद करणे. | ३२<br>डिसेंबर | ३२<br>२१/१२/२०१२ | मंजूर |